शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २२८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## औरंगजेबाची कबर हे महाराष्ट्राच्या पराक्रमाचे प्रतीक; कबर नष्ट करुन इतिहास संपवू नका - सदानंद मोरे

**मुंबई -** औरंगजेब हा विषय महाराष्ट्रात येण्यामागे छावा हा सिनेमा आहे. जे काही अत्याचार औरंगजेब याने केल्याचं दाखवलं आहे त्यामुळे लोकांच्या मनात क्षोभ निर्माण झाला. शिवाजी सावंत यांच्या छावा या कादंबरीवर हा सिनेमा आहे. छावा ही कादंबरी आली तेव्हा तिला खूप चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यावेळचे एक अधिकारी शिवाजीराव पाटील असं म्हणाले होते की ही कादंबरी वाचून महाराष्ट्रातील आया-बाया रडतील. पण तसं काही घडलं नाही. आता सिनेमा आल्यावर हे घडतं आहे. याचं कारण काय? याचा मी विचार केला तेव्हा लक्षात आलं की छावा वाचणं आणि छावा पाहणं यातला हा फरक आहे. वाचताना प्रत्येकाची कल्पनाशक्ती दृश्य समोर येईल अशी असतेच असं नाही. आता एखादा निर्माता, दिग्दर्शक येऊन अशा सिनेमा तयार करतात तेव्हा तो क्षोभ निर्माण झाला. असं सदानंद मोरे यांनी म्हटलं आहे. थिंक बँकला दिलेल्या मुलाखतीत सदानंद मोरे यांनी हे मत मांडलं आहे.

मी औरंगजेबाच्या बाबतीत विचार करतो तेव्हा खटकन एक बाब मझ्यासमोर येऊन गेली. कालचक्र कसं असतं बघा.. इतिहासाची विडंबना वगैरे आपण ज्याला म्हणतो ते आहे. औरंगजेब हा चार भावांपैकी एक. त्याला राज्यतृष्णा होती. तीन प्रतिस्पर्धी भावांचा काटा त्याने शिताफीने काढला. इंग्लंडमध्ये औरंगजेब हयातीत असताना औरंगजेबाने सत्ता कशी मिळवली त्यावर एक नाटक लिहिण्यात आलं. ते इंग्रजी भाषेत होतं. त्याच्या शिताफीची जागतिक पातळीवर त्याची दखल घेतली गेली. औरंगजेबाचा ताकदीचा प्रतिस्पर्धी होता दारा शिकोह, मुराद, सुरजा वगैरे महत्त्वाचे नाहीत. दाराला शाहजानचा पाठिंबा होता. त्यानंतर दाराशी युद्ध झालं. दारा त्यात हरला. दाराला पकडण्यात आलं. दाराची दिल्लीत पान २ वर

## तोतला परिवाराच्या सहकार्यामुळे डायलिसिस सेंटरला गती मिळाली- खालापूरे

**परतूर | प्रतिनिधी -** शहरातील दृष्टी लॉयन्स नेत्रालय क्लबच्या दवाखान्यात डायलिसिस ची सुविधा एका महिन्यात सुरू होणार असल्याची माहिती लॉयन्स नेत्रालयाचे अध्यक्ष मनोहर खालापूरे यांनी दिली. स्वर्गीय ओंकारदासजी तोतला यांच्या स्मृती प्रियतर्थ लॉ. अर्चनाताई व लॉ. नितीनजी तोतला जालना, यांच्या तर्फे एक डायलिसिस मशीन साठी ६ लक्ष ७२ हजार रुपये देणगी जाहीर केली आहे. लॉयन्स परिवार व दृष्टी फाउंडेशन चे सर्व संचालका तर्फे तोतला परिवाराचे आभार व अभिनंदन करण्यात आले. परतुर येथे दृष्टी लॉयन्स नेत्रालय अंतर्गत चालू होत असलेल्या डायलिसिस सेंटर साठी दोन मशीन लवकरच घेण्यात येणार आहेत. या करिता लॉयन सुनीता बोराडे यांच्यातर्फे एक लक्ष ११ हजार व लॉयन संजीवनी खालापुरे यांच्यातर्फे एक लक्ष ११ हजार विजया श्रीनिवासजी सोमाणी पुणे यांच्यातर्फे एक लक्ष रुपये व उर्वरित मशीनच्या रकमे करिता सर्व संचालक . वेदिका इंटरप्राईजेस जालिंदर अवचार यांच्यातर्फे आरो सिस्टीम देणगी देण्यात येत आहे. एकूण दोन मशीन लॉयन्स डायलेसिस सेंटर परतुर येथे बसवण्यात येणार असून एक महिन्यांमध्ये डायलिसिस सेंटर कार्यान्वित होऊ शकते .




तोतला परिवाराच्या सहकार्यामुळे या डायलिसिस सेंटरला गती आलेली आहे. यावेळी सर्व लॉयन्स परिवाराच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. जालना येथे झालेल्या डिस्टिक गव्हर्नर यांच्या क्लब भेटीअंतर्गत उपस्थित डिस्टिक गव्हर्नर, गिरीशजी सिसोदिया, माजी डिस्टिक गव्हर्नर, पुरुषोत्तमजी जयपुरिया, माजी डिस्टिक गव्हर्नर, विजयजी बगडिया. संगीता सिसोदिया, जयश्री लढ्ढा, मंजू श्रीमाळी कल्पना बियाणी, कमलबाबु झुनझुनवाला, सुनील बियाणी, मनोहर खालापुरे, अरुण मित्तल, अतुल लढ्ढा, संदीप चव्हाण, राजेश लुनिया व इतर सर्व लॉयन्स सदस्य उपस्थित होते.

## महापुरुषांच्या बॅनरची विटंबना करणाऱ्या आरोपीसह घटना घडवून आणणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**जालना | प्रतिनिधी -** कन्हैयानगर भागातील छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या बॅनरची विटंबना करणाऱ्या आरोपीवर आणि या घटनेच्या मागील सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली. तसेच भविष्यात अशा घटनांना आळा बसावा म्हणून शहरातील सर्व महत्त्वाच्या चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचीही मागणी करण्यात आली.

धुलीवंदनाच्या दिवशी एका तरुणाने नशेच्या अवस्थेत येऊन चौकातील खांबावर चढून बॅनर हलवण्याचा प्रयत्न केला. त्याच्या सोबत्याने त्याला खाली उतरवले, मात्र खाली उतरल्यावर संबंधित तरुणाने गवळी समाज व मराठा समाजाला शिवीगाळ केली. यावेळी उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ रेकॉर्ड करून समाजमाध्यमांवर व्हायरल केला.

सदर घटना घडत असताना त्वरित कारवाई करण्याऐवजी ती व्हिडिओ स्वरूपात प्रसारित करण्यात आली. त्यामुळे ही घटना घडवून आणून तिचे राजकीय भांडवल केले जात असल्याचा संशय निवेदनात व्यक्त करण्यात आला. विधानसभेतही या विषयावर चर्चा झाली, मात्र घटनास्थळी असलेल्या व्यक्तींनी आरोपीला तत्काळ पोलिसांच्या ताब्यात का दिले नाही, हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

या घटनेची सखोल चौकशी करून खऱ्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सर्वपक्षीय नेत्यांनी केली आहे. यावेळी धनराज काबलीये (अध्यक्ष, अहिर गवळी सामूहिक विवाह समिती, जालना), नंदा पवार (जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा), विजय चौधरी (जिल्हा उपाध्यक्ष, काँग्रेस कमिटी, जालना), अरुण सरदार (शहर सरचिटणीस, काँग्रेस कमिटी, जालना), राजू नरवैये (अध्यक्ष, तेली समाज, जालना), सुभाष कांबळे (दलित संघटना), गणेश चांदोडे (जिल्हा सरचिटणीस, काँग्रेस कमिटी), विनोद यादव (अध्यक्ष, यादव अहिर संघ, जालना), बालाजी आडीयाल (पद्मशाली समाज), विवेक पाटील, अभयकुमार यादव (सचिव, शहर बेघर झोपडपट्टी युनियन, जालना), रोहित जोशी, हर्षल मेहता, राहुल रत्नपारखे, जीवन खंडागळे (तालुका प्रमुख, दलित आघाडी), जगदीश चौंडीये, निरज हरदेकर, किशोर कदम यांची उपस्थिती होती.

यापुढे अशा घटना पुन्हा होऊ नयेत म्हणून महत्त्वाच्या चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. संबंधित घटनेतील आरोपी आणि त्याच्या पाठीराख्यांवर कठोर कारवाई करून समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीला रोखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

युवा आदर्श

### ऑर्डर ...

ऑर्डर ऑर्डर दटावणी
जोरात बसला दंडका
वाट पाहतो ऑर्डरची
यंत्रणा बसते थंड का
बुलेट संपल्या केंव्हांच
हाती रिकाम्या बंदुका
पुरावे मागतात किती
कमी पडल्या संदुका
पद प्रक्षाळण करे अति
झिजून गेल्या पादुका
प्रत्येक मनात विचार
माझा मतलब साधूका
ऐकलेले होते कितीदा
कोर्ट पायरी चढू नका
का नडला अतिउत्साह
केल्यापुन: त्याचं चुका
वकील भरतात खिसे
खाता अक्रोड खारका
कोण देणार सल्ला तो
थोडेतरी रे पुढे सरका
न्यायदेवता रे आंधळी
पक्षकार बहिरा मुका
कॅलेंडर्स संपले तरीही
पडतात पुढील तारखा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## टेंभुर्णीत वाढदिवसानिमित्त चार हजार कचराकुंडी वाटप

**टेंभुर्णी | प्रतिनिधी -** येथे रेल्वे राज्यमंत्री खा. रावसाहेब पाटील दानवे यांच्या वाढदिवसाच औचित्य साधून ग्रामसंसद कार्यालयाकडून टेंभुर्णी मध्ये मंगळवारी रोजी ४००० कचराकुंडी घराघरात महिलांना वाटप करण्यात आली यांची सुरुवात दत्तनगर भागातून झाली या वेळी सरपंच प्रतिनिधी गौतम मस्के पुष्पाताई म्हस्के व सुरेश आण्णा सोळुंके दत्ता सोनसाळे संदीप मुळे धनराज देशमुख मनोज पंडित प्रमोद उखर्डे प्रदीप काबरा शिवाजीमुळ ग्रामसंसद कर्मचारी सुनिल भाले अजिस बागवान दिगंबर भिसे बाबासाहेब जमधडे अनिस बागवान अनिल गायकवाड रामदास धनवई भिका माने शंकर आढावे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामपंचायत सदस्य महिला वर्ग व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



## जालना समाजकल्याण समोरून मोटार सायकल चोरीला

**जालना | प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालय, जालना समोरील समाज कल्याणच्या गेट समोरून मंगळवार ता.१८ रोजी दुपारच्या सुमारास ताऊबा खरात यांची मोटार सायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. जालना तालुक्यातील नंदापूर येथील ताऊबा भगवान खरात यांनी दि.२१/०९/२०१९ मध्ये मोटार सायकल क्रमांक (MH 21 BN 0475) HF डिलक्स हिरो काळ्या कलरची घेतली होती. मंगळवार दि. १८ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या समाज कल्याणच्या गेट जवळ हॉटेल असलेल्या ठिकाणी ताऊबा खरात यांनी दुपारी १२.३४ च्या सुमारास आपली मोटार सायकल हँन्डल लॉक करून उभी केली होती. ताऊबा खरात आणि त्यांच्या सोबत असलेले मित्र रामदास खरात हे चहा पिण्यासाठी गेले असता अवघ्या १०-१५ मिनिटांतच चोरंट्यांनी समाज कल्याणच्या गेटसमोर उभी केलेली मोटार सायकल लंपास केली आहे. तालुका पोलीस ठाण्यात लेखी तक्रार केली असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मंगलताईंना मिळाला आधार

**जालना -** मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेला जालना जिल्हा. याच जिल्ह्यातील अंबड तालुक्यात चुरमापुरी हे एक छोटेसे खेडेगाव आहे. चुरमापूरी येथील मंगल रामभाऊ बोडखे ही महिला स्वत:च शेतमजूरी व घरचे काम करत संसाराचा गाडा ओढत असते. श्रीमती बोडखे यांचे शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत झालेले आहे. तसेच पती रामभाऊ बोडखे हे सतत आजारी असल्याने ते गावातच छोटीसी पिठाची गिरणी चालवून आपल्या संसाराला हातभार लावत उदरनिर्वाह करत असतात. त्यांच्या परिवारात त्यांना मुलगा नसून ६ मुलीच आहेत. त्यापैकी ५ मुलींचे लग्न झाले असून त्या त्यांच्या संसारात खुश आहेत. तर सर्वांत लहान मुलगी ही अविवाहीत असून ती सध्या शिक्षण घेत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या खात्यावर दर महिना १५०० रुपये येणार असल्याची बातमी त्यांना भ्रमणध्वनीद्वारे मिळाली. आजूबाजुच्या सुशिक्षीत महिलांकडून त्यांना वारंवार नारी शक्ती पवर अर्ज केला का मावशी अशी विचारणा होवू लागली. त्यांनी नाही म्हणून सांगितले. त्यानंतर त्यांच्या थेट घरीच अंगणवाडी सेविका पोहचल्या त्यांनी मला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेविषयी सविस्तर माहिती देवून सर्व कागदपत्रे जमवाजमव करण्यास सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी परत घरी येवून अंगणवाडी सेविकेने त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज यशस्वीरित्या ऑनलाईन भरला. त्यामुळे अर्ज करतेवेळी प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही व वेळेत अर्ज दाखल झाला असल्याची माहिती त्यांनी दिली. आर्थिक अचडणीच्या काळात पैशांची अत्यंत निकड असतानाच ऑगस्ट महिन्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मंगल रामभाऊ बोडखे यांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले असल्याचा भ्रमणध्वनीवर संदेश आला असल्याचे त्यांच्या लहान मुलीने त्यांना सांगता क्षणीच त्यांना खुप आनंद झाला.



त्याचवेळी प्रथमत: रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाल्याचे ऐकुन बंधूराया मुख्यमंत्री दादा असे शब्द उच्चारत आकाशाकडे पाहून हात जोडत मनापासून आभार मानले. रक्षाबंधनानिमित्त आपणास उत्कृष्ट भेट मिळाली असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त करत गावातील इतरही महिलांना त्यांनी आपल्या खात्यावर पैसे जमा झाल्याची आनंदाने बातमी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मंगल रामभाऊ बोडखे यांच्या खात्यावर पहिल्याचवेळी ३ हजार रुपये जमा झाले असल्याने त्यांनी या पैशातून गृह उपयोगी साहित्य तसेच किराणा सामानाची खरेदी करत आपल्या उदरनिर्वाहाचा गाडा पुढे चालू ठेवला आहे. या योजनेमुळे त्यांना अत्यंत मोलाची मदत होत असल्याचेही त्यांनी सांगितले. घर, संसारातील निकडीच्या वस्तु, पदार्थ तसेच मुलीचे शिक्षण आणि वारंवार आजारी राहणाऱ्या पतीचा औषधांचा खर्च मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पैशातून त्या करत असल्याचेही त्यांनी सांगितले. मध्यंतरीच्या काळात गावात लाडकी बहीण योजना बंद पडणार अशी अफवा पसरली होती त्यावेळी मनात नुसती बैचेनी सुरु असल्याने फार घुसमट झाली असे सांगून भविष्यातही ही योजना चालू रहावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. तुच आमच्या गोरगरिबांचा पाठिराखा मुख्यमंत्री दादा. असे म्हणत पुन्हा आकाशाकडे पाहुन दोन्ही हात जोडत महाराष्ट्र शासनाचे मनापासून आभार मानले.

## संपादकीय

# चिमण्यांसाठी एवढे कराच!

दरवर्षी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही हा दिवस जगभर उत्साहात साजरा केला गेला. चिमणी या चिमुकल्या पक्षासाठी व त्याचा संरक्षणासाठी हा दिवस साजरा केला जातो. झपाटयाने कमी होणारी चिमण्यांची संख्या लक्षात घेऊन २० मार्च जागतिक जागतिक दिवस म्हणून साजरा केला, तसेच येणाऱ्या पिढीला चिमणी हा पक्षी माहीत असावा या उद्देशाने हा दिवस चिमणी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. भारतात सर्वात जास्त माहीत असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. पूर्वी गल्लीबोळात, बाल्कनीत, गच्चीवर, झाडावर दिसणाऱ्या व मानवी वस्तीत मुक्त संचार करणाऱ्या चिमण्या आज दिसेनाशा झाल्या आहेत. अन्य पशुपक्ष्यांप्रमाणे चिमण्यांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. सहा महिन्यातून एकदा दोन चार अंडी घालणाऱ्या चिमण्यांना मिलन काळात मातीची गरज असते. पण मातीची जागा आता सिमेंटने घेतली आहे. सिमेंटच्या जंगलामुळे व वाढत्या वृक्षतोडीमुळे चिमण्यांचा अधिवास नष्ट झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची उपलब्धता, शहरांमधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यासारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या झपाटयाने कमी होत आहे. २० मार्च हा दिवस चिमण्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची घटती संख्या अशीच कायम राहिली तर येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ चित्रांमधूनच पाहता येईल. पक्षी हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सकाळी आपल्याला झोपेतून उठवणाऱ्या कोकिळेपासून चिमण्यांचा किलबिलाटापर्यंत सारे पक्षी आपला सारा दिवस आनंददायी जावा यासाठी आपल्या कानावर आणि मनावर नादमधुर संगीताचे स्वर उमटवीत असतात. जसे हिरवेगार झाडे बघून मन प्रसन्न होते, तसेस पक्ष्यांमुळे मन आनंदी होते त्यासाठी पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे महत्वाचे त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत, छपरावर कृत्रिम घरटी ठेवावीत. त्यात ज्वारी, बाजरी, गहू यासारखी धान्ये ठेवावीत. बाल्कनीत, गॅलरीत मातीच्या भांड्यात पाणी ठेवल्यास ते चिमण्यांना पिण्यास मिळेल व त्यांना उन्हाळ्याची झळही बसणार नाही. केवळ चिमणी दिवस साजरा करुन चिमण्या परत येणार नाहीत याचा विचार व्हावा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पुणे शहरात कौशल्य विकास केंद्र उभारणार - मंत्री उदय सामंत

**मुंबई -** पुणे शहरात शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येत असतात. तसेच रोजगारासाठी येणाऱ्या तरुण - तरुणींची संख्याही मोठी आहे. पुणे शहरात विद्यार्थी, तरुणांच्या कौशल्य विकासात वाढ करण्यासाठी सी.एस.आर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्स बिलीटी) अंतर्गत कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली. पुणे महापालिकेत समाविष्ट गावांतील समस्यांबाबत सदस्य विजय शिवतारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली.

पान १ वरुन

## औरंगजेबाची कबर ...

मरतुकड्या उंटावरुन धिंड काढण्यात आली होती. अशीच धिंड संभाजी महाराजांचीही काढण्यात आली होती. दिल्लीतून धिंड काढण्यात आल्यानंतर दाराचा शीरच्छेद करण्यात आला. त्यानंतर ते शीर औरंगजेबाकडे आलं. औरंगजेबाने ते दाराचं शीर आहे ना? याची खात्री केली. त्यानंतर ते शीर एका पेटीत ठेवलं आणि शाहजानला भेट म्हणून पाठवलं. त्यावेळी शाहजानला वाटलं औरंगजेबाचं मन बदललं. पण त्याला दाराचं शीर दिसलं त्यावेळी त्याला त्याचं क्रौर्य कळलं. औरंगजेबाचं समर्थन कुणीही माणूस कुठल्या धर्माचाच नाही जो माणूस आहे तो करुच शकत नाही.

दारा शिकोहला मारल्यानंतर त्याच्या मृतदेहाचे अंत्यसंस्कार करायचे. त्यामुळे कबर बांधणं भाग होतं. दिल्लीत हुमायूँनची कबर आहे. राजपुरुष असल्याने दाराच्या मृतदेहाचा अंत्यविधी नीट होऊ दिला नाही. दाराचा मृतदेह गाडण्यात आला. तो कुठे गाडला हे निश्चित कुणालाच सांगता येत नाही. दारा शिकोह भारताच्या धर्म निरपेक्षतेचं प्रतीक आहे. ५५ उपनिषदांचं भाषांतर त्याने पर्शियन भाषेत केलं होतं. दारा शिकोहने या सगळ्यासाठी बलिदान दिलं आहे. कारण दारा काफिर आहे असं सांगूनच औरंगजेबाने काटा काढला होता. दाराच्या प्रेताची, कबरीची औरंगजेबाने विटंबना केली. आता कालचक्र ज्याला म्हणतो ती तशी पाळी औरंगजेबावर येते की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. असं सदानंद मोरे म्हणाले. औरंगजेबाची कबर पाडावी, उद्ध्वस्त करावी या मताचा मी मुळीच नाही. मला ते मान्य नाही. का मान्य नाही? जो क्षोभ उसळला आहे तो मी समजू शकतो. कारण ते मनुष्य स्वभावाला धरुन आहे. इतिहासाचा अभ्यासक म्हणून मी हे सांगतो की एवढा महत्त्वाकांक्षी औरंगजेब जो दक्षिणेत आला, जे मार्गात होते त्यांना संपवायचं होतं. कुतूबशाही होती, आदिलशाही होती. त्यांचा निकाल औरंगजेबाने लावला. पण मराठे राहिले. स्वराज्य अवघ्या ६ वर्षांचं आहे. कारण १६७४ मध्ये महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि १६८० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज वारले. औरंगजेबाला महाराष्ट्र जिंकता आला नाही. औरंगजेबाची कबर हे महाराष्ट्राच्या पराक्रमाचं प्रतीक आहे. ती पाहिल्यानंतर महाराष्ट्रातील माणसाची छाती फुलून आली पाहिजे. कारण तो आपल्या इतिहासाचा भाग आहे. एक मुद्दा महत्त्वाचा आहे तो म्हणजे औरंगजेब कुणाचा हिरो होऊ नये. ती खबरदारी घेतली पाहिजे, तो होता, लढला आणि इथेच संपला हे लोकांना कळलं पाहिजे. कबर नष्ट करुन तुम्ही तुमचा इतिहास संपवू नका. असं सदानंद मोरे यांनी म्हटलं आहे.

# जागतिक चिमणी दिवस साजरा



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरातील नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती.जे.बी. के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात आज दि.२० मार्च रोजी, जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला, विद्यार्थ्यांना पर्यावरणाची आवड निर्माण व्हावी, त्यांना पर्यावरणातील वेगवेगळ्या सजिव घटकांची माहिती व्हावी, त्यांच्यात जागृती निर्माण होऊन वन्य प्राणी, पशुपक्षी, यांच्या विषयी आवड निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय हरित सेना, सामाजिक वनीकरण विभाग जाफ्राबाद, यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी. प्राचार्य. नंदकुमार काळे हे होते. तर सामाजिक वनीकरण जाफ्राबाद विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी. एस. पी.पवार, वनपाल. बी.एच.पाटील, वनरक्षक. विजय राठोड, उमेश भूमकर, पर्यवेक्षक.धनंजय पुराणे, गणेश सावसक्के,. एस.बी. बोरकर, विनोद गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी एस. पी.पवार यांनी जागतिक चिमणी दिवस साजरा करण्या मागची भुमिका विशद केली, तसेच पर्यावरणातील विविध पक्षांच्या अस्तित्वाचे काय महत्त्व असते,आपण दुर्मिळ होत चाललेल्या विविध पक्षांच्या प्रजातींचे कसे संवर्धन केले पाहिजे,या संदर्भात मौलिक मार्गदर्शन केले. या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते,पर्यावरणात पक्षाचे महत्त्व या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत- पहिल्या गटातः- प्रथम क्रमांक. कु. कार्तिकी भरत गायके, द्वितीय क्रमांक. शिवम मनोज पंडित, तृतीय क्रमांक. गौरव रवींद्र आढावे, यांनी पटकावला, तर दुसर्या गटातः-प्रथम क्रमांक. कु.आरती सोनाजी गोरे, द्वितीय क्रमांक. कु.श्वेता बाळासाहेब घुगे, तृतीय क्रमांक. रेणुका शरद भोरे, यांनी पटकावला, या स्पर्धेत जवळपास २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. गुणवंत विद्यार्थ्यांना सामाजिक वनीकरण विभाग जाफ्राबाद यांच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल. बि.एच. पाटील व वनरक्षक विजय राठोड, यांनी विद्यार्थ्यांना पक्षांसाठी कृत्रिम घरटे तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले, आणि विद्यार्थ्यांनी नवोपक्रम म्हणून पक्षांचे घरटे तयार केले, विद्यार्थ्यांनी या पर्यावरण विषयक कार्यक्रमात सहभागी होऊन मनस्वी आनंद घेतला,आपण ही पर्यावरण संवर्धनात योगदान दिले पाहिजे याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली, उन्हाळ्यात पक्षांसाठी कृत्रिम घरटी तयार करणे, त्यांच्या साठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, त्यांना घराच्या अंगणात, छतावर, परिसरात धनधान्य टाकले पाहिजे, ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली.या प्रसंगी मुख्याध्यापक.नंदकुमार काळे यांनी विद्यार्थ्यांना पक्षाचे घरटे तयार करण्याचा उपक्रम दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृक्षमित्र- भिवसन ससाणे यांनी केले. तर आभार प्रदर्शन वृक्षमित्र विष्णू जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश इंगळे, रवींद्र मोरे, राजेंद्र जगताप, राजेश शेवाळे, वृक्षमित्र डॉ. अरुण आहेर, वृक्ष मित्र दगडुबा तांबेकर, नागोराव देशमुख, दिपक देशमुख यांनी परिश्रम घेतले. शेवटी मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. व कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

## महाराष्ट्र शासनाचे वतीने शाहीर नानाभाऊ परिहार कोनडकर यांचे आकोट येथे व्याख्यान सादर




**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** नुकतेच अकोट येथे माहेश्वरी भवन छत्रपती शिवाजी महाराज चौक आकोट या ठिकाणी सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई महाराष्ट्र शासन शिबिर संचालक शाहीर विजय पांडे यांचे वतीने ठेवण्यात आलेले पारंपारिक शाहिरी दहा दिवसाचे शिबिर चालू असून यामध्ये शाहीर नानाभाऊ परिहार यांनी शाहिरी निर्मिती ते आजच्या काळाची शाहिरी लोककला बदललेल्या काळाला अनुसरून श्री छत्रपती शिवाजी महाराजापासून ते आज पर्यंत विद्यार्थ्यांना व्याख्यान रुपी शिकवून प्रात्यक्षिक पोवाडे, राष्ट्रीय गीते, लोकगीते, सादर करून शिबिर संचालक श्री विजय पांडे यांनी शाहीर परिहार यांचा सत्कार करून आभार समारंभाने कार्यक्रमाची सांगता झाली.


## प्रा.पांडुरंग आठवले यांच्या स्मृतिदिनी फळ वाटप

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) येथे सम्यक बहुउद्देशीय संस्था, सम्राट ग्रुप वाळूज व त्यागमूर्ती रमाई प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षक नेते दिवंगत प्रा. पांडुरंग आठवले यांच्या चौथ्या स्मृतिदिनी फळवाटप करण्यात आले, बाहेरगावाहुन येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांनी यावेळी फळ मिळत असल्याने आनंद व्यक्त केला, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्या चेहऱ्यावर या उपक्रमामुळे उत्साह दिसून आला,याप्रसंगी डॉ. मिलिंद आठवले, प्रा. शिलवंत गोपनारायण, डॉ. समाधान वाघमारे,शुभम चौतमल, योगेश बहादुरे व डॉ. राजू वानखेडे यांची उपस्थिती होती.



## मातृभाषा, अन्य भाषा: परस्पर संबंध आणि विकास निबंध स्पर्धेचे आयोजन

हुंडाविरोधी चळवळ, मुंबई या सामाजिक संस्थेच्या बावन्नाव्या वर्धापन दिनानिमित्ताने महाराष्ट्रातील १८ वर्षांवरील व्यक्तींसाठी मातृभाषा ,अन्य भाषा: परस्पर संबंध आणि विकास या विषयावर खुली निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली आहे.



**नियम:** निबंधाची कमाल शब्दमर्यादा १२०० शब्द असून निबंध फक्त मराठी भाषेत लिहिता येईल.

निबंध फुलस्कॅप अथवा ए ४ आकाराच्या आखलेल्या कागदावर एकाच बाजूने सुवाच्य अक्षरात लिखित अथवा टंकलिखित असावा.

निबंधाची मूळप्रत पाठवावी, फोटोप्रत स्वीकारली जाणार नाही.

निबंध ईमेलवर स्वीकारला जाणार नाही.

टंकलिखित निबंधाच्या प्रत्येक पृष्ठावर स्पर्धकाने स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे.

स्पर्धकाने निबंधाला जोडून स्वतःच्या स्वाक्षरीसह स्वतःचे संपूर्ण नांव , संपूर्ण पत्ता ( पिनकोडसह ) वय, व्यवसाय, टेलिफोन नंबर व ईमेल लिहावा.

सदर निबंध यापूर्वी कुठल्याही निबंध स्पर्धेत बक्षिसपात्र ठरलेला नसून निबंध मी स्वतः लिहिलेला आहे असे प्रमाणपत्र लेखकाच्या स्वाक्षरीसह निबंधाच्या शेवटी देणे अनिवार्य आहे.

**बक्षिसे :** पहिल्या तीन क्रमांकांच्या विजयी स्पर्धकांना रोख रु.२५००/- रु.१५००/- आणि रु.१०००/- अशी तीन रोख पारितोषिके आणि पहिल्या दहा क्रमांकांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल. सर्वोत्कृष्ठ निबंधास जगन्नाथ परळकर ट्रॉफी दिली जाईल .

स्पर्धेसाठी तज्ञ परीक्षक नियुक्त केले जातील व त्यांचा निकाल सर्वांवर बंधनकारक राहील व निकालाला कोठेही आव्हान देता येणार नाही.

स्पर्धकांनी आपला निबंध ३० एप्रिल २०२५पर्यंत पुढील पत्त्यावर पाठवावा.

प्रती,
आशा कुलकर्णी ,महासचिव
-हुंडाविरोधी चळवळ,
४ /५० विष्णूप्रसाद, 'बी ' सोसायटी,
शहाजीराजे मार्ग, पार्ले बिस्कीट
फॅक्टरी जवळ, विलेपार्ले (पूर्व )
मुंबई ४०००५७ .
संपर्क : दूरध्वनी : ०२२ -२६८३६८३४ भ्रमणध्वनी : ९८१९३७३५२२ अथवा ९८१९५३९१९३.
इमेल : antidowry498agmail.com. Visit us at : www.antidowrymovement.com




### काही राजकीय पक्ष जिल्हाध्यक्ष व प्रतिनिधींची बैठक संपन्न

# मतदार यादी पुनरिक्षण व अद्यावतीकरणाच्या अनुषंगाने चर्चा

**जालना । प्रतिनिधी -** मतदार याद्या तयार करणे, त्यांचे पुनरिक्षण व अद्यावतीकरण करण्याच्या अनुषंगाने राजकीय पक्षांशी स्थानिक स्तरावर विचार विनिमय करुन त्यांच्या सुचना घेण्याच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर काही मान्यता प्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांच्या प्रतिनिधीसोबत गुरुवार (दिनांक १९) रोजी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात, बैठक संपन्न झाली.

यावेळी बैठकीस उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, शिवसेना, (उध्दव बाळासाहेब ठाकरे) गटाचे विधानसभा समन्वयक दिपक गो. रणनवरे, प्रतिनिधी महेश भालेराव, विधानसभा अध्यक्ष, ब.स.पा. करनाडे, जालना जिल्हाध्यक्ष (महिला) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस श्रीमती नंदाताई पवार, प्रतिनिधी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) सुरेश खंडाळे, जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी संजोग हिवाळे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस शहर जिल्हा सरचिटणीस गणेश चांदोडे, सिध्दीविनायक मुळे यांची उपस्थिती होती. मात्र, राष्ट्रीय पक्ष समाजवादी पक्षाला या बैठकीला आमंत्रित केले गेल्या नसल्याची माहिती आहे.

यावेळी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि. १८ मार्च, २०२५ रोजीची विधानसभा मतदार संघ निहाय मतदार संख्येबाबत माहिती देण्यात आली. यावेळी बैठकीत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी मतदार यादीतील दुबार नावे वगळण्या ची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करणे बाबत सुचना केल्या. जालना शहरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या उपस्थितीबाबत, जालना शहरातील ब-याच मतदारांकडे मतदार ओळखपत्र हे चढ सिरिज (जुने) असल्याने त्या मतदारांची नावे मतदार यादीमध्ये शोधतांना त्यांची नावे मतदार यादीत आढळून येत नाहीत, तेव्हा निवडणूक आयोगाने अशा सर्व संबधीत मतदारांना नवीन मतदार ओळखपत्र देण्यात यावे अशी विनंती केली. मतदार यादी वाटपाबाबत, वयाची १८ वर्ष पूर्ण असलेल्याा नवविवाहीत तरुणींना मतदार यादीत नाव नोंदणी करतांना विवाह नोंदणी प्रमाणपत्रा समवेतच लग्नत पत्रिका मतदार यादीत नांव नोंदणीसाठी पूरावा म्हाणून ग्राहय धरण्यीबाबत विनंती केली. निवडणूक काळात विविध राजकीय पक्षाकडून प्रचारासाठी विकसीत केले जाणारे ॲप्सग यांना मतदारांची माहितीच्यात तपशीलाचा स्त्रोनताबाबत माहिती विचारली. मतदारांच्या मतदार यादीतील नावाबाबत व अन्यी तपशीलाबाबत गोपनीयता बाळगण्याोत यावी यासह अन्य विषयाबाबत विषयावर यावेळी चर्चा झाली.लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५०, लोक प्रतिनिधीत्व. अधिनियम १९५१,मतदार नोंदणी अधिनियम १९६० यानुसार व भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी प्राप्तच



होणा-या आदेशानुसार निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व कामकाज पार पाडले जाते. मुख्यन निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या https://ceoelection.maharashtra.gov.in/ceo/ या अधिकृत वेबसाईटवर जावून मतदार, राजकीय पक्ष/उमेदवार, भारत निवडणूक आयोगाचे विविध ॲप्सा, मतदारांसाठी मदत व सहायता, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ विषयक माहिती, निवडणूक प्रक्रिये संबंधित माहिती, भारत निवडणूक आयोगाने विकसीत केलेले आयसीटी ॲप्लीमकेशन्सक, स्वीणप जनजागृती विषयक माहिती, भारत निवडणूक आयोगाची प्रकाशने याबाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. भारत निवडणूक आयोगाच्याप निर्देशानुसार मतदार यादीत नाव नोंदणीसाठी ०१ जानेवारी, ०१ एप्रिल, ०१ जुलै आणि ०१ ऑक्टोबर या दिनांकावर आधारीत मतदार नाव नोंदणी करण्यायत येते याबाबतची माहितीउपस्थित राजकीय पक्ष प्रतिनिधींना जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी यावेळी दिली.

# शिक्षणसेवक कालावधी रद्द करावा

### शेख अब्दुल रहीम यांचे मुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री यांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील शिक्षणसेवकांतर्फे विनंती करण्यात येते की शिक्षणसेवक (परिविक्षाधीन कालावधी) रद्द करण्याचा निर्णय हा आपल्या कार्यकाळात महायुती सरकारने असा ऐतिहासिक निर्णय घ्यावा. अशा मागणीचे निवेदन थेट राज्याचे मुख्यमंत्री मा. ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि शालेय शिक्षणमंत्री मा. ना. श्री.दादा भुसे साहेब यांना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी आज रोजी मंत्रालयात, मुंबई येथे सादर केले. राज्यात अनेक वर्षानंतर शिक्षक भरती झालेली आहे व या महागाईच्या काळात तुटपुंज्या मानधनावर घरखर्च चालविणे शक्य होत नाही. त्यात जवळजवळ सर्व शिक्षणसेवक यांचे वय ३५ वर्षांच्या जवळपास किंवा त्यापेक्षा पुढे गेलेले आहे. तसेच महाराष्ट्र व गुजरात वगळता कुठल्याही राज्यात शिक्षण सेवक कालावधी लागू नसून नियुक्तीनंतर लगेचच पूर्ण वेतन लागू होते व याचा उल्लेख नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देखील करण्यात आलेला आहे. त्यामुळे या संपूर्ण परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शिक्षणसेवक कालावधी रद्द करावा व शिक्षणसेवक धारकावर होत असलेला अन्याय लवकरात लवकर दूर करावा अशी आपल्या सरकारला राज्यातील हजारो शिक्षणसेवक यांच्या कटुंबाकडून आग्रहाची विनंती करत आहोत. आपले शासनच हा ऐतिहासिक निर्णय घेऊ शकते अशी आम्हाला अशी आशा आहे. म्हणून आमच्या निवेदनाची दखल घेऊन त्वरित न्याय द्यावा. समान काम, समान वेतन हा राज्यातील शिक्षण सेवकांचा अधिकार आहे, शिक्षण सेवक पद सुरू करून एक प्रकारची शिक्षण सेवकाची एक प्रकारची आर्थिक पिळवणूक केलेली आहे. ही योजना तत्काळ बंद करून हजारो शिक्षण सेवकाना न्याय द्यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते तथा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक संपादक शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षणाकडे वळावे -प्रा. डॉ. मोरे

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** ग्रामीण विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाकडे प्रोत्साहित करताना! जिजाऊ कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय वरुड येथे मार्गदर्शन सत्राचे यशस्वी आयोजन केल्याचा आनंद. प्रा. डॉ. राजेंद्र मोरे यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्राकडे वळण्याचे महत्त्व पटवून दिले. जिजामाता ग्रामीण विकास व शिक्षण संस्थेचे संचालक म्हणून मी वचन देतो की, नीट/सीईटी तयारीसाठी आवश्यक सर्व सुविधा आम्ही आपल्याच गावात परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देऊ, जेणेकरून ग्रामीण विद्यार्थ्यांना दूरवर जाण्याची गरज पडणार नाही. सरपंच विलास आप्पा शिंदे आणि इतर मान्यवरांसह आम्ही शैक्षणिक संधी आपल्या दारापर्यंत आणण्यासाठी कटिबद्ध आहोत!




# मोहिनी कावळे ‘आदर्श शिक्षक महापौर’ पुरस्काराने सन्मानित!




**मुंबई । प्रतिनिधी -** जोगळेकरवाडी महानगरपालिका हिंदी शाळा क्र. २ च्या मुख्याध्यापिका, प्रभारी विभाग निरीक्षक (हिंदी माध्यम) श्रीमती मोहिनी नरसिंग कावळे यांना शिक्षक दिनाचे औचित्य साधून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दिला जाणारा २०२३-२४ सालातील सर्वोच्च 'आदर्श शिक्षक महापौर' पुरस्कार अति.आयुक्त अमित सैनी व मनपा शिक्षणाधिकारी राजेश ककांळ सर यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी महापालिकेचे शिक्षण उपायुक्त डॉ. प्राची जांभेकर, मुख्तार शाह (उपशिक्षणाधिकारी लोकसहभाग कक्ष), किशन पावडे, पाटील सर (प्रशासकीय अधिकारी एफ -उत्तर विभाग), कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी सर, प्रभारी बीओ पुजा पाटील मॅडम, पूर्व मुख्याध्यापिका प्रीतपाल कौर मॅडम उपस्थित होत्या.

श्रीमती. मोहिनी नरसिंग कावळे यांनी त्यांच्या ३२ वर्षाच्या अविरत सेवा काळात विद्यार्थी आणि समाजोपयोगी उपक्रम यशस्वी केले. त्यामध्ये प्रामुख्याने शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण,झोपडपट्टीतील पालकांच्या गृहभेटी, पटसंख्या वाढीसाठी मार्गदर्शन,शिष्यवृत्ती मुलांना प्रोत्साहन, शाळा व्यवस्थापन, मुख्यमंत्री माझी शाळा, घर घर तिरंगा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, शिक्षण दिंडी, स्वच्छ भारत अभियान, मझी माती माझा देश, असे अनेक यशस्वी उपक्रम शाळा स्तरावर केले. याचीच दखल घेत बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना २०२३ - २४ सालातील सर्वोच्च 'आदर्श शिक्षक महापौर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. .

श्रीमती. मोहिनी नरसिंग कावळे यांना,आदर्श शिक्षक महापौर'पुरस्कार प्राप्त झाल्याने शाळेतील सर्व शिक्षक वर्ग आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तीने त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

# २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा न्यायालय जालना व सर्व तालुका न्यायालयामध्ये प्रलंबित मोटार वाहन अपघात कायद्याअंतर्गत नुकसान भरपाईचे प्रकरणे, प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणे, कलम १३८, एन.आय. बँकेची वसुली प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, मजुरी संबंधीचे वादाची प्रकरणे, क्टची प्रकरणे, भुसंपादनाची प्रकरणे, इलेक्ट्रीसीटी, पाणी बिल, महसुलची प्रकरणे व इतर प्रकरणे तसेच दावा दाखलपुर्व प्रकरणे, इत्यादी प्रकरणासाठी दि. २२ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन केले आहे. तरी सर्व संबंधितांनी या संधीचा लाभ घेवून आपली प्रकरणे लोकअदालतमध्ये ठेवून तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# फसवणुकीच्या आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी -** येथील ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (छ. संभाजीनगर) श्रीमती यु.एम. वैद्य यांनी कलम ४२० सह ३४ अन्वये दाखल गुन्ह्या अंतर्गत फौजदारी खटला क्रमांक १८६०/२०१६ मधून आरोपी धनराज दौलतराव डोंगरे व ईतर यांची गुरुवार (दि २०) रोजी निर्दोष मुक्तता केली.

मुकुंदवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्हा क्रमांक ३९७/२०१५ अन्वये फिर्यादी गणेश उत्तमराव जाधव यांनी सुंदरवाडी शिवारातील गट क्रमांक ३९ मधील प्लॉट क्रमांक ३२ बाबत वैयक्तिक स्वार्थापायी धनराज डोंगरे, ऋषिकेश देशमुख व सुभाष उप्पलवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता, ज्यात त्यांना विक्री केलेला प्लॉट परस्पर इतरांना हस्तांतर करून फसवणूक केल्याचे नमूद केले होते.

सदर गुन्ह्याच्या तपासाअंती मुकुंदवाडी पोलिस ठाण्यामार्फत वि. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार यांची साक्ष व संबंधित दस्तऐवजांची पडताळणी करून सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपी धनराज डोंगरे यांच्या वतीने जालना येथील ॲड. दिपक बलवंत नाईक यांनी युक्तिवाद करून बाजू मांडली तर त्यांना अन्य आरोपींच्या वतीने ॲड. विक्रम होण व ॲड. पवन साळवे यांनी सहकार्य केले.

# शिक्षक महासंघाचे सरकार विरुद्ध आंदोलन



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** राज्यातील शिक्षकांच्या विविध समस्या सोडवल्या जात नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा.डां.संजय शिंदे, उपाध्यक्ष प्रा. रवींद्र पाटील, सचिव प्रा. लक्ष्मण रोडे यांच्या मार्गदर्शना खाली. सर्व राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी,

राज्यातील अंशतः अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ देण्यात यावी .शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १०-२०-३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना ही लागू करावी .एम.फिल. व पीएच.डी धारक शिक्षकांना वेतन वाढ लागू करावी. शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरावीत .अशा अनेक मागण्यासाठी आज राज्यभर आंदोलन करण्यात आले .याचाच एक भाग म्हणून जाफ्राबाद तालुका कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाने वतीने तहसीलदारांना निवेदन देऊन सरकार विरुद्ध आंदोलन करण्यात आले.यावेळी शिक्षक महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. डॉ. अरुण आहेर, तालुका अध्यक्ष प्रा.एस एम पाटील, उपाध्यक्ष प्राचार्य मुकुंदा राऊत ,उपप्राचार्य व्ही.टी.हिवराळे, प्रा. ए.पी .पंडित, प्रा. बी .जी बाविस्कर ,प्रा.उत्तम वाघ,प्रा.ए.डी. ब्रह्मराक्षस, प्रा.डॉ. एस. एस. मुळे, प्रा.डॉ. जी. आर .खेडेकर ,प्रा. जी.आर बायस, मुख्याध्यापक एस .आर. पंडित ,प्रा.ए. एम साबळे प्रा.डी.एन.उबाळे, प्रा. जी .एन .सपकाळ, प्रा. ए.एस. अजिंक्य, प्रा.व्ही.एस.जाधव. याची उपस्थिती होती.

# जिल्हा महिला व बाल विकास विभागाने रोखले १३१ बालविवाह

### बालविवाहाच्या २ प्रकरणात गुन्हे दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात बालविवाह निर्मुलन कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे. जिल्हा महिला व बाल विकास विभागाने चालु वर्षात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्यातील एकुण १३१ बालविवाह रोखले आहेत. तसेच जानेवारीपासुन आजपर्यतच्या कालावधीत बालविवाहाच्या २ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे यांनी दिली.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध अधिनियम संपुर्ण जिल्ह्यात लागू करण्यात आलेला आहे. कायद्यान्वये विवाहासाठी मुलीचे वय १८ तर मुलाचे वय २१ वर्षे पुर्ण असणे बंधनकारक आहे. तसे नसल्यास विवाहास उपस्थित नातेवाईक, मंडपवाले, पुरोहित, आचारी हे कायद्यानूसार दंडात्मक कारवाईस पात्र ठरतात. अधिनियमानूसार दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतुद आहे. प्रशासनाकडून बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक तर शहरी भागासाठी बाल कार्यक्षेत्रात जनजागृतीपर आणि प्रतिबंधात्मक विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

ग्रामस्तरावर बालविवाह थांबविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या




विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे बालविवाहाला प्रतिबंध घालण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांनी आपापल्या ग्रामस्तरीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्रास होत असल्यास त्यांना पोलिस संरक्षण तात्काळ पुरविण्यात येते. बालविवाह झाल्यास त्या बालिकेवर खेळण्या-बागडण्याच्या वयात कुटुंबाची जबाबदारी लादली जाते. यामुळे मुलीची शारिरीक व बौध्दीक वाढ परिपूर्ण होवू शकत नाही.

गावात ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आदि ठिकाणी चाईल्डलाईनचा १०९८ हा हेल्पलाईन क्रमांक नमुद करण्यात आलेला आहे. तरी आपल्या गावात बालविवाह होत असल्यास जागरुक व्यक्तींनी चाईल्डलाईनच्या टोल फ्री १०९८ या क्रमांकावर माहिती कळवावी, यामध्ये आपले नाव गोपनीय ठेवण्यात येईल असा संदेश भिंतीवर जनजागृतीसाठी रंगीत स्वरुपात नमुद करण्यात आलेला आहे. तरी बालविवाह थांबविण्यासाठी सुजान व्यक्तींनी आपल्या आजुबाजुला बालविवाह होत असल्याची माहिती चाईल्डलाईनच्या टोल फ्री १०९८ क्रमांकाद्वारे प्रशासनाला देवून सहकार्य करावे. जिल्हा बाल संरक्षण समितीच्या त्रैमासिक बैठकीत बालविवाहमुक्त ग्राम पंचायत संकल्पना राबविण्याचे निर्देशही दिलेले आहेत.

# मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनकडून महाराष्ट्राच्या डिजिटल गव्हर्नन्सच्या मॉडेलला सहकार्य

## बिल गेट्स यांची ग्वाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बिल गेट्स यांच्यादरम्यान चर्चा

**मुंबई** - राज्यातील शासकीय कामामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास सुरूवात झाली आहे. या डिजिटल गव्हर्नन्स आणि राईट टू सर्विसमध्ये महाराष्ट्राला देशात मॉडेल करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनकडून सहकार्य दिले जाईल. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महिला स्वयंरोजगाराच्या २५ लाख लखपती दिदींच्या उद्दिष्टपूर्तीसाठी या उपक्रमात सहभाग घेवून म हिलांना उद्योजक बनविण्यात गेट्स फाऊंडेशनने भागीदारी घेण्याची तयारी दर्शवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक, प्रख्यात उद्योजक आणि गेट्स फाऊंडेशनचे बिल गेट्स यांच्यात सकारात्मक चर्चा झाली.

मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स तसेच गेट्स फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. गेट्स आणि मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यादरम्यान आरोग्य, कृषी आणि पायाभूत सुविधांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत सकारात्मक चर्चा झाली.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री आणि बिल गेट्स यांची पहिल्यांदाच भेट होत असून याचा आनंद असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र परिवर्तन टप्प्यातून जात असल्याने पायाभूत सुविधा, कृषी, आरोग्यामध्ये मोठे प्रकल्प सुरू आहेत. ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता असल्याने दर्जेदार आरोग्य सेवा-सुविधा देण्यासाठी गेट्स फाऊंडेशने सहकार्य करावे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आरोग्य आणि कृषी क्षेत्रामध्ये करण्यासाठी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. पुणे जिल्ह्यात एआयच्या वापरातून ऊसाचे दुप्पट उत्पादन घेतल्याचे उदाहरणही मुख्यमंत्र्यांनी दिले.

**शेतकऱ्यांना २४ तास वीज देण्यासाठी सोलरचा वापर**

शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून यासाठी २०२२-२३ पासून सोलरचा वापर करण्यात येत आहे. ३० टक्के वीज निर्मितीम धून आता ५२ टक्क्यांपर्यंत सोलरम धून वीजनिर्मिती होत असल्याने शेतकऱ्यांना कमी खर्चात वीज उपलब्ध होत आहे. त्यांना २४ तास वीज देण्यासाठी विजेचे सर्व फिडर सोलरद्वारे करण्याचे नियोजन असल्याची माहितीही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी बिल गेट्स यांना दिली.

नवी मुंबई येथे ३०० एकर परिसरात इनोव्हेशन सिटी करण्यात येत असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. यावर श्री. गेटस यांनी इनोव्हेशन सिटी आणि इतर उपक्रम ासाठी आर्थिक बाबीसोबत तांत्रिक मदतीत भागीदारी करण्याची ग्वाही दिली.

**मलेरियामुक्त महाराष्ट्रासाठी प्रयत्न**

महाराष्ट्रात डासांमुळे मलेरिया आजाराच्या रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मलेरियाम ुक्त महाराष्ट्र करण्यासोबतच डेंग्यू नियंत्रणासाठी गेट्स फाऊंडेशन प्रयत्नशील आहे. यासाठीही तांत्रिक, आर्थिक मदत करण्यात येणार असून गडचिरोली जिल्ह्यापासून याची सुरूवात करण्यात येणार असल्याची ग्वाही बिल गेट्स यांनी दिली.

**२५ लाख लखपती दीदीसाठीही भागीदारी**

क्रिस्पर केस नाईन आणि दुग्ध उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मायक्रोसॉफ्ट प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र राज्यातील गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी भागीदारी करणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महिला सबलीकरण आणि



स्वयंरोजगारासाठी २५ लाख महिला लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट निश्चित केल्याचे सांगितले, शिवाय गरीब आणि गरजू महिलांना राज्य शासन महिन्याला मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून १५०० रूपये देत असल्याची माहिती दिली. या उपक्रमातही सहभाग घेण्यास म ायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशन तयार असल्याचेही बिल गेट्स यांनी सांगितले. महिलांचे संपूर्ण आर्थिक व्यवहार डिजिटल करण्यासाठी सहकार्य करण्याची गेट्स यांनी तयारी दर्शवली.

**शाश्वत ऊर्जेसाठी भागीदारी घेणार**

महाराष्ट्रातविविध सामाजिक संस्था, शासकीय संस्था, कंपन्यांच्या सहकार्याने शाश्वत ऊर्जेसाठी भागीदारी घेणार असून याचा शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचेही श्री. गेट्स यांनी सांगितले. महाराष्ट्रात मोठी क्षमता असल्याने महाराष्ट्राचे विकासाचे मॉडेल जगभर नेण्यास प्रयत्न करण्याची ग्वाही श्री. गेट्स यांनी दिली.

बिलगेट्स यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना सियाटल भेटीसाठी आमंत्रण दिले. या भेटीप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ श्रीकर परदेशी, गेट्स फाउंडेशनचे भारतातील संचालक हरी मेनन, गेट्स फाऊंडेशनच्या जागतिक म लेरिया प्रकल्पाचे संचालक फिलिप वेलकॉफ, आरोग्य सल्लागार डॉ. आनंद बंग आदी उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.